***मौलिक विचार माला १६***

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

# उपासना आणि भक्ती



*- डॉ. कृ. मा. घटाटे*

रु. ५





## श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

*(इ. स. १८८१ ते १९१५)*

**''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''**

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी **''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय''** प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून **शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.**





जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा **सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त** जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* नाममाहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.





* आन्तर् आणि बाह्य समाधींचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांची तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची नवीन निर्मिती.
* **इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत,** या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि

तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.

* न्याय-वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांची षड्दर्शनानुसार प्रस्तुती.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा; याचे मार्गदर्शन.
* **'आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे'** या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन : उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* **तीन हजार वर्षापूर्वी आर्यसंस्कृती विश्वव्यापक होती,** या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह. गानसोपान-ग्रंथाची निर्मिती.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* 'प्रक्षिप्त व भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला किंवा आर्ष-वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्वतःच्या उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.





* मुलांसाठी उपदेश. * स्त्रीगीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन. * नाटक लेखन. * १७ आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीची प्रक्रिया : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी व ब्रजभाषेत एकूण लहानमोठ्या १३९ ग्रंथांची रचना.
* पत्रे-११८ *अभंग-२०९९, *पदे-२२५२, *गीत-१२५०,
* श्लोक– १०००,
* ओव्या - २३०००, *एकूण पृष्ठे ६०००.

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणाऱ्या नवनवीन योगदानांकडे पाहिले असता, अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद आद्य शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान् श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्रोत अखंड असल्याची जाणीव होते.

०००





## प्रास्तविक

श्रीगुलाबर ावमहाराजांचे विवेचन जुन्या भक्तिमीमांसेहून अगदी नवीन नसले तरी त्यांची मांडणी **पूर्वपक्ष- उत्तरपक्ष- मध्यस्थ व सिद्धान्तपक्ष** या पद्धतीने असल्यामुळे त्यांच्या भक्तिशास्त्राचा वेगळेपणा उठून दिसतो.

स्वतःला अपूर्ण समजणाऱ्या जीवाला पूर्णत्वाचा अनुभव आणून देणे, हेच वेदान्तशास्त्राचे प्रयोजन आहे. जीवाला सर्वत्र नाश, अज्ञान आणि दुःख या त्रयींचा अनुभव क्षणोक्षणी येत असतो. हे तिन्ही अब्रह्मप्रत्यय नाहीसे होऊन सत्, चित् व आनंद प्राप्त करून देण्याचे आश्वासन वेदांतशास्त्र देते. —त्यासाठी प्रथम नामरूपांचा व्यतिरेक करून निर्गुण आत्मप्रत्यय हृदयात घ्यावयाचा असतो.





त्यानंतर तेच आत्मतत्त्व बाहेर दिसणाऱ्या नामरूपातही भरले आहे, असा अन्वयानुभव घेण्याची आवश्यकता असते. हा अन्वयानुभव भक्तीनेच येतो. पण या अन्वयात होणाऱ्या भक्तीत भासणारे द्वैत खरे नसते. अद्वैताचा प्रत्यय कायम राहूनच शक्ति-स्फुरणामुळे भक्त व भगवान् असे आहार्यद्वैत भक्तीत भासते. स्वानंदाचा पुनः पुनः आस्वाद घेण्यासाठी अद्वैतब्रह्मच द्वैतरूपाने स्फुरत असते. असे शक्तीचे दोनरूपाने स्फुरण पावणे व पुनः शक्तीचे परबह्मात एकरूप होणे, ही परब्रह्माची निष्प्रयोजन अशी लीला आहे.

हिलाच चिद्विलास किंवा पराभक्ती म्हणतात. ही भक्ती परमप्रेमस्वरूपा असून परब्रह्माच्या आनंदांशावर स्फुरत असते. या संबंधी महाराजांनी नवीन असे मूलगामी विवेचन

करून भक्तिशास्त्रात महत्वाची भर टाकली आहे.

***उपासना***

पराभक्ती अंतिम प्राप्तव्य असली तरी तत्पूर्वी अद्वैतज्ञानानुभव अत्यंत आवश्यक आहे. आणि ज्ञानाच्या आधी प्रथम

**१.**वैदिक किंवा पौराणिक **सगुणोपासना** = वैराजोपासना किंवा प्रतीकोपासना,

**२.निर्गुणोपासना**

**३.अवतारोपासना** यातून एक करावीच लागते.[१]

या उपासनांचे फळ म्हणून प्रथम निर्गुणसमाधी प्राप्त होते[२] त्यानंतर वैदिक सगुणोपासकांना आणि निर्गुणोपासकांना प्रयत्न करून स्वयंफलरूपा पराभक्ती मिळवून घ्यावी लागते.[३]

परंतु जे अवतारांची उपासना करतात त्यांना मात्र ज्ञान झाल्यानंतर आपोआप





पराभक्ती मिळते. - अवतारोपासकांची गौणी भक्ती म्हणजे उपासना हीच पुढे पराभक्तीत रूपांतर पावते. परमप्रेमरूप होऊन जाते.

* वैदिक किंवा पौराणिक सगुणोपासनेत अब्रह्म वस्तूचे ठिकाणी ब्रह्मभावना म्हणजे **उत्कर्षबुद्धी** करावी लागते.

- परंतु अवतारोपासनारूप गौणीभक्तीत पूर्णब्रह्म सगुणसाकार भगवंतावर वृत्ती **'तदाकार'** कराव्या लागतात. उत्कर्षबुद्धीची गरज नसते.[४]

अवतारांच्या उपासनेत भावना कर्तृतंत्र असली तरी उपास्य वस्तुतंत्र असते, असा मोठा फरक आहे.

उपासना साधन आहे आणि पराभक्ती स्वयंफलरूपा आहे, वगैरे भक्त्याचार्यांचे सूत्रबद्ध सिद्धांतच महाराजांनी मधुराद्वैतदर्शनाच्या भक्तिशास्त्रात अत्यंत विस्तारपूर्वक शास्त्रीय





परिभाषेत मांडले आहेत.

सर्व भक्तांनी अनुभवलेले भक्तीचे सिद्धांत \ ŒE¥ EÌ Âzo° y**योजना** नवीन आहे. **युक्तिवाद** व **उपपत्ती** नवीन आहेत.

भगवंताचेअवतारविग्रह-साकार असून सच्चिदानंदघन पूर्णब्रह्म आहे (पांचभौतिक नाही) असे सर्व संतांनी, आचार्यांनी व वेदपुराणांनी सांगितले असले तरी **''अनध्यस्तविवर्त''** या महाराजांनी योजलेल्या नवीन संज्ञेत ते सर्व विस्तृत अर्थ एकत्र होऊन प्रस्तुत होतात हे महत्वाचे आहे.

**भक्तीचेसोळा प्रकार**

अनध्यस्तविवर्त सगुण भगवंताच्या भक्तीचे महाराजांनी गोविंदानंदसुधा व प्रीतिनर्तन या ग्रंथात सोळा प्रकारांचे विवेचन आहे. पहिले आठ प्रकार गौणी भक्तीचे म्हणजे साधनरूप





आहेत. पुढील चार प्रकार मध्यमा भक्तीचे असून ते ज्ञानोत्तर भक्तीत समाविष्ट होतात व शेवटचे चार प्रकार पराभक्तीचे असून तीच **'संयोगेऽपि वियोगोपलालनरूपा माधुर्यभक्ती'** म्हटली जाते. असे सोळा प्रकार सांगूनही शेवटी महाराज म्हणतात की- एकदा पराभक्ती मिळाली की गौणी मध्यमा- परा असे भेद नाहीसे होऊन सारे प्रकार पराभक्तीचेच नवनवीन उन्मेष हाऊन राहतात.

या भक्तीत द्वैताला कोठेही स्थान नाही. या अद्वयभक्तीच्या विवेचनाने शंकराचार्यांच्या अद्वैताला महाराजांनी माधुर्य आणले आहे. अशा प्रकारे शंकराचार्यांचे अद्वैत आणि संतांची माधुर्य भक्ती हे दोन्ही मिळून महाराजांचे ज्ञानेश्वर-मधुराद्वैत-दर्शन तयार झाले आहे.

**शांकरज्ञानसंयुक्तं भगवद्भक्ति-अलंकृतम् ।**

**यद्‌वाक्यं तत्प्रमाणं स्यादिति स्वमतनिर्णयः॥**

### ‘तत्त्वमसि’ : पराभक्ती

‘‘तत्त्वमसि’’ या महावाक्यातून पराभक्ती कशी साधून घ्यावी यासंबंधी महाराजांनी भक्तिपदतीर्थामृतात प्रक्रिया वर्णिली आहे.

मी ब्रह्म आहे, हा व्यतिरेकानुभव ज्या महावाक्यातून घेतला जातो त्याच महावाक्यातून अन्वयानुभव साधून निर्वृत्तिक पूर्णब्रह्मस्थिती कशी प्राप्त करून घ्यावी, याचे अजूनपर्यंत कोण्याही पूर्वसूरींनी दिग्दर्शन केलेले दिसत नाही. पण महाराजांनी त्या महावाक्यात असलेला भक्तिपर अर्थ दाखवून देऊन तत्त्वानुभूतीच्या परिसरात आपले वैशिष्ट्य प्रस्थापित केले आहे.

‘‘तत्त्वमसि’’ महावाक्यातून ज्ञानानुभव घेणारा अधिकारी साधनचतुष्टयसंपन्न मुमुक्षु





असतो. पण याच महावाक्यातून पराभक्ती प्राप्त करून घेणारा अधिकारी मात्र अद्वैतज्ञान संपन्न ज्ञानी असतो. हा या दोन्ही प्रक्रियेतील महत्वाचा भेद आहे. जसा ज्ञानेश्वरीचा अधिकारी मुमुक्षू आणि अमृतानुभवाचा अधिकारी जीवन्मुक्त असतो तसेच येथेही आहे.

याप्रमाणे *प्रथम सच्चिदानंदातील आनंदांशावर भक्तीची स्थिती, नंतर *भक्तीचे सोळा प्रकार व शेवटी *‘तत्त्वमसि’ महावाक्यातून भक्तीचा उपदेश असे तीन विभाग महाराजांनी सूक्ष्म रीतीने उलगडून दाखविले आहेत.

### उपासना व भक्ती

श्रीमहाराजांनी उपासना आणि भक्ती यातील सूक्ष्म भेद अगदी स्पष्ट करून सांगितले आहेत. ते अतिशय महत्वाचे आहेत. उपासना व भक्ती हे दोन्ही शब्द बरेच वेळ एकाच





अर्थाने वापरले जातात. कधी भक्तीला उपासना म्हटले जाते तर कधी उपासनेला भक्ती म्हटले जाते; म्हणून त्यांच्या निश्चित अर्थाविषयी बहुतेक लोकांचा गैरसमज असतो आणि उपासनेवरील आक्षेप भक्तीवर घेतले जातात. म्हणून महाराजांनी केलेला उपासना व भक्तीचा भेद आपण थोडक्यात पाहू आणि भक्तिशास्त्रातील महाराजांच्या मूलगामी आणि नवीन विवेचनाचा परामर्श घेऊ.

(१) भगवंताच्या सगुणसाकार विग्रहावर ‘आत्मज्ञानाच्या पूर्वी’ केलेले प्रेम म्हणजे **उपासना म्हणजे गौणी भक्ती.**

(२) अद्वैत ज्ञानानंतर भगवंताच्या सगुण विग्रहावर स्वाभाविकपणे होणारे प्रेम म्हणजे **भक्ती.**

(३) भक्ती व उपासनेत ज्ञानपूर्वक व अज्ञानपूर्वक असा भेद असला तरी दोन्ही





ठिकाणचे **प्रेम मात्र एकच** असते.

(४) उपासनेमुळे भगवान् प्रसन्न होतो व भक्ताला समाधीचा अनुभव देऊन त्याला **आत्मज्ञानसंपन्नता** देतो. ‘‘बुद्धियोगं ददामि ते’’

(५) त्यानंतर होणाऱ्या वृत्तिस्फुरणात म्हणजे व्युत्थानदशेत भक्त भगवंताचे स्वाभाविक प्रेम करू लागतो. तिलाच **भक्ती** किंवा **ज्ञानोत्तर भक्ती** किंवा **पराभक्ती** किंवा **चिद्विलास** अशी नांवे आहेत. (ही उपासना नव्हे)

(६) उपासनेचे प्रकार- **१.अवस्तुभावन, २.उत्कर्षबुद्धी आणि ३.तदाकारकरण** असे तीन प्रकार आहेत. हीच ज्ञानपूर्व गौणी भक्ती.

(७) ज्ञानोत्तर भक्तीचे **मध्यमा** आणि **परा** असे दोन प्रमुख भेद आहेत.

(८) नवविधा भक्तीतील सख्यत्वापर्यंतचे आठ प्रकार उपासनेत मोडतात.

(९) श्रीगुलाबरावमहाराजांनी नवविधा भक्तीनंतर आणखी ६ प्रकारच्या ज्ञानोत्तर आणि परा भक्तीचे सांगोपांग विवेचन करून भक्तिशास्त्रात नवे योगदान दिले आहे.

(१०) पण अद्वैतानुभवानंतर मात्र आनंदांशाच्या ठिकाणी हे सर्व १६ प्रकार पराभक्तीचेच उन्मेष असल्याचा प्रत्यय येतो.

याप्रमाणे असलेल्या ज्ञानपूर्व उपासना व ज्ञानोत्तर भक्ती या दोहोतील मुख्य भेदांचा थोड्या विस्ताराने विचार करू.

(तक्ता १ / तक्ता २ विचारसंपदेतून पहावे)

०००





**(तक्ता १)** **उपासना : ज्ञानपूर्व**

- *** अवस्तुभावन**
  - * अतत्त्वभावन
  - * कर्तृतंत्र
- *** उत्कर्षबुद्धिः**
  - * अक्षिपुरुषोपासना
  - * सूर्योपासना
  - * प्राणोपासना,
  - * विराडोपासना (वैदिक)
  - * इंद्र, वरुण,
  - * सूर्य, चंद्र,
  - * शनी, मंगळ वगैरे (वैदिक, पौराणिक)
- *** तदाकारकरण**
  - * शिवविष्णू अवतारोपासनाः
  - * वस्तुतंत्र
  - * पूर्णब्रह्माची उपासना
  - * अष्टविधा गौणीभक्ती

---

**(तक्ता २)** **भक्ती : ज्ञानोत्तर**

विष्णु-शिवांच्या अवतारांची भक्ती

- प्रध्यमा (चतुर्विधा)
- परा (चतुर्विधा)





## उपासना आणि भक्ती

उपासना व भक्ती हे दोन्ही शब्द वेदान्त व भक्तिवाङ्मयात बरेच वेळा एकाच अर्थाने वापरले जातात. त्यामुळे त्यांच्या अर्थाची कधी कधी अदलाबदल होत असते. या शब्दांच्या अर्थातील भेद लक्षात घेतला नसेल तर कधी भक्ताला उपासक म्हटले जाते तर कधी उपासकाला भक्त म्हटले जाते. या दोन शब्दातील अर्थाचा स्पष्ट भेद दाखवून त्यांचा विस्तारपूर्वक ऊहापोह महाराजांनी केलेला आहे.

त्यांतील मुख्य भेद म्हणजे उपासना ही अद्वैतज्ञान होण्यापूर्वीची असते आणि भक्ती ही ज्ञानोत्तर असते. उपासनेत उपासक व भगवान् असे द्वैत असते, नंतर अद्वैतज्ञानयुक्त समाधी साधली जाते व पुढे पुनः होणाऱ्या वृत्तिस्फुरणरूप व्युत्थानात पूर्वीसारखेच ''भक्त





व भगवान असे आहार्यद्वैत'' स्वीकारून भक्त भगवद् विग्रहावर सर्व प्रेमवृत्तींचे समर्पण करीत राहातो. तिला पराभक्ती म्हणतात. एकूण काय तर ज्ञानाच्या पूर्वी उपासना असते व ज्ञानोत्तर भक्ती असते.

हे उपासना व भक्तीतील भेद वेदपुराणादि प्राचीन वाङ्मयात आणि संतवाङ्मयात सांगितलेले आहेत. पण ते इतस्ततः असल्याने स्पष्टरूपाने एकत्र सांपडत नाहीत. म्हणून महाराजांनी पूर्वाचार्यांच्या आधाराने दाखवून दिलेले सर्व प्रकार एकत्र केल्यास एक नवीनच दृष्टी प्राप्त होते. ही नवीन दृष्टी महाराजांच्या भक्तिशास्त्राच्या सिद्धीतील फार महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे महाराजांचे भक्तिविवेचन आणि संतसाहित्यातील मांडले गेलेले भक्तीचे सर्वश्रेष्ठत्व आकलन

होण्यास मदत होते.महाराजांनी **ज्ञानपूर्व उपासनेचे** एकूण तीन विभाग केलेले आहेत.

१) अवस्तुभावन

२) उत्कर्षबुद्धी

३) तदाकारकरण. (अष्टविधा भक्ती)

**ज्ञानोत्तर भक्तीचे मध्यमा** (४ प्रकार) व **परा** (४ प्रकार) असे प्रकार केले आहेत.

पण शेवटची पराभक्ती मिळाल्यानंतर गौणी, मध्यमा व परा या अलग अलग न राहता ते १६ प्रकार मिळून एक पराभक्तीच होऊन राहते.

### *(१) अवस्तुभावन*

वेदामध्ये **'योषिदग्निः'** अशी एक उपासना करावयास सांगितले आहे. खरोखर स्त्री अग्निरूप कधीच नसते परंतु कर्त्याने तशी भावना करावी अशी वेदाज्ञा आहे. या





भावनेने केलेल्या उपासनेचे फल ईश्वर-संकल्पानेच होत असते. येथे वस्तूच्या विरोधी भावना सांगितल्या आहेत. म्हणून याला अवस्तुभावन किंवा अतत्त्वभावनही म्हटले जाते. यातील भावना आणि ध्यान पूर्णतः कर्तृतंत्र असते.[१]

### *(२) उत्कर्षबुद्धी*

**'उत्कर्षबुद्धिरुपासना'** असे उपनिषदातील उपासनांचे स्वरूप आहे. उपनिषदांमध्ये अक्षिपुरुषोपासना, प्राणोपासना, सूर्योपासना वगैरे अनेक उपासना ब्रह्मप्राप्तीसाठी सांगितल्या आहेत. त्याचप्रमाणे वेदात आणि पुराणात इंद्र, सूर्य, वरुण, शनी, मंगळ वगैरे अनेक प्रकारच्या उपासना नानाविध फलप्राप्तीसाठी आहेत. या सर्व उपासना करीत असताना 'उपासकाने उपास्याच्या ठिकाणी





ब्रह्मबुद्धी करावी' असे उपदेशिले आहे. श्रीशंकराचार्यांनी **'ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्'** या सूत्रावरील भाष्यात जीवोपासना प्रतिपाद्य नसून उपास्याचे ठिकाणी ब्रह्मभावनाच अपेक्षित आहे, असा शास्त्रांचा निर्णय प्रतिपादन करून जीवोपासनेचा पूर्णपणे निषेध केला आहे. अब्रह्म वस्तूच्या ठिकाणी ब्रह्मभावना करणे, मूर्तीच्या ठिकाणी ईश्वभावना करणे हेच उपासनेचे तत्त्व महाराज 'स्वमतनिर्णयात' स्पष्ट करतात.

**कार्या मूर्तौ ईशदृष्टिः मूर्तिदृष्टिर्न चेश्वरे ।**
**एतच्चोपासनातत्त्वम् इति स्वमतनिर्णयः ॥**

या ठिकाणी देखील उपास्याच्या ठिकाणी ईशदृष्टीच करावी असा नियम आहे. अन्यथा पतन होते कारण जीवबुद्धी झाली तर ती उपासनाच राहत नाही.

उपासक जेव्हा दगडाच्या मूर्तीची





उपासना करतो तेव्हा मूर्तीला दगड समजत नाही, ईश्वर समजतो. आणि त्यामुळेच पूजाअर्चा परमेश्वराला मिळते. सर्वव्यापक असणारा ईश्वर दगडातही असल्यामुळे त्या प्रतिमेच्या माध्यमातून उपासकाला प्रसन्न होतो व त्याचे मनोरथ पूर्ण करतो.

त्याचप्रमाणे स्त्रीने पतीला, मुलाने आईबाबांना, शिष्याने गुरूला परमेश्वर समजून त्यांची उपासना केली तरच ती परमेश्वर प्राप्ती करून देते परंतु त्यांचे ठिकाणी चुकून जरी जीवबुद्धी झाली तरी ती उपासना व्यर्थ होते. कष्टच फक्त मिळतात, अन्ततो गत्वा मिळणारे खरे फळ मात्र मिळत नाही -

ही उत्कर्षबुद्धी असलेली उपासना कर्तृतंत्र असते. आणि कर्त्याच्या भावनेप्रमाणे फलद्रूप होते. 'येथे प्रतिफळे भावना आपुलाली'

### *(३) तदाकारकरण*

वेदपुराणादिकांत हरिहरांच्या आणि त्यांचे अवतार रामकृष्णादि यांच्या उपासना सांगितल्या आहेत. 'उपासकांवर अनुग्रह करण्यासाठी मी अवतार घेतो' असे भगवद्वचन आहे. हे उपास्य असलेले रामकृष्णादिकांचे विग्रह 'पूर्णब्रह्म' असतात. त्यामुळे त्यांचे ठिकाणी ब्रह्मभावना म्हणजे उत्कर्षबुद्धी करण्याचे मुळीच कारण नाही. पुराणादिकांत त्यांची अवतारचरित्रे वर्णन केली आहेत. त्यानुसार त्यांच्या मूर्ती करता येतात. चित्रे काढता येतात. त्या मूर्ती, भगवच्चरित्रे व षड्गुणैश्वर्यादी गुणांचे अधिष्ठान होतात. त्यामुळे कर्त्याची भावना येथे फारशी अपेक्षित नाही. अवतारविग्रह वस्तुतंत्र असल्यामुळे कर्त्याची तेथे ब्रह्मभावना नसली तरी चालते. अवतारांच्या ठिकाणी





पुत्रभावना, शत्रुभावना कोणतीही भावना असली तरी चालू शकते. जसे अजामिळाने पुत्र म्हणून नारायणाचे नाम घेतले तरी त्याचा उद्धार झाला. रावण कंसादिकांनी शत्रू म्हणून भगवंताशी विरोध केला पण त्यांनाही भगवंताने मुक्तीच दिली. कारण अवतार व अवताराची नामरूपे वस्तुतंत्र आहेत. अवतारांचे नामस्मरण व मूर्तिदर्शनउपासकाच्या अन्तकरणाची शुद्धी करून त्याला ब्रह्मज्ञानाला अधिकारी करून देण्यात सर्वश्रेष्ठ साधने आहेत.

याप्रकारे अवतार हे पूर्णब्रह्म असल्यामुळे उपासकाने आपल्या सर्व वृत्ती तदाकार करावयास हव्या. येथे भावनेनुसार ध्यान नसून वस्तूनुसार ध्यान असते. म्हणून अवतारोपासना कर्तृतंत्र नसून वस्तुतंत्र आहे.

कर्तृतंत्र व वस्तुतंत्र उपासनांमध्ये एकच





साम्य आहे ते असे की दोन्हीत ध्यान करणाऱ्याचा प्रयत्न मुख्य असतो.

अवस्तुभावनारूपी उपासनेत वस्तुविरोधी भावना असते (योषिदग्निः) व दुसऱ्यात उत्कर्षबुद्धी असते - पण या अवतारांच्या उपासनेत वस्तूच्या अनुसार भावना असते. हाच महत्वाचा फरक आहे. म्हणूनच या उपासनांमध्ये हरिहरांची व त्यांच्या अवतारांची उपासनाच श्रेष्ठ आहे. अवतारांच्या उपासनेत आपल्या आवडीला सवड आहे. आपल्याला आवडेल ती मूर्ती घेऊन तीवर सर्व प्रेमवृत्ती अर्पण करता येतात.[२]

**त्यातूनी प्रिय आणि कोमल । सुरेख आणि विमल । सुबाहू आणि सुनील । जे स्निग्धसोज्वळ आलिंगनी ॥७८॥** गीतासंगती य १, पा. ६५

ध्यान करण्यासाठी असे कोवळे सुंदर





रूप घ्यावे म्हणजे एकाग्रता सिद्धी सहजरीत्या फळते नंतर उपासनेत जे एकदेशी सगुण भासते तेच परोक्ष ज्ञान झाले की व्यापक वाटू लागते.- **तैं ध्यानावरी मन । अधिक जडे ॥८२॥** गीतासंगति.

असे परोक्षज्ञान झाल्यावर अपरोक्ष-ज्ञान होण्यासाठी शमदमादि - साधनसंपत्तीचा अभ्यास करून ते साधावे लागतात. साधकाला अभ्यासाचे कष्ट सहन होत नाहीत. तितिक्षा वगैरे साधता साधता नाकी नऊ येतात. पण अवतार मूर्तींच्या उपासनेमध्ये सुरवातीपासून अखेरपर्यंत 'सद्गुरुकरुणाविश्वासवृत्ती' सखीरूपाने असते. ती आपल्याला शेवटपर्यंत सहज नेते. उपासना परिपक्व झाली की अपरोक्ष साक्षात्कार होऊन समाधी साधली जाते. **'ददामि बुद्धियोगं तं येन माम् उपयान्ति ते'**

भगवानच गुरुरूपाने अद्वैत आत्मज्ञानसंपत्ती उपासकाला प्रदान करतात. असा जीवब्रह्मैक्यरूपी आत्मसाक्षात्कार होईपर्यंत उपासना म्हटली जाते. त्यानंतर मात्र उपास्य असलेला पूर्णब्रह्म सगुण भगवानच सर्वत्र व्यापक दिसू लागतो. अन्तर्बाह्य ब्रह्मसाक्षात्कार होऊ लागतो आणि भक्ताच्या सर्व प्रेमवृत्ती सगुण विग्रहावर अर्पण होऊ लागतात. यालाच अन्वय किंवा चिद्विलास म्हणतात. हीच पराभक्ती होय.

***वैदिक-पौराणिक देवतोपासना आणि अवतारोपासना यातील भेद***

१) उपासनेत क्रिया मुख्य असते. वैदिक उपासना कर्मसमुच्चितच असते. बाह्य उपचारांना जास्त महत्व असते. प्रेमाला गौणत्व असते.

*अवतारोपासनेत प्रेम मुख्य असते.





बाह्य उपचार न मिळाले तरी चालून जाते.[3] प्रेमाने एक तुलसीदल वाहिले तरी भगवान प्रसन्न होतो. सर्व पूजा अर्चनादि क्रिया प्रेमाने होत असतात. प्रारब्धाने जे जे कर्म घडते ते ते सर्व भगवदर्पण होत असते. येथे प्रेम मुख्य असून क्रिया गौण असते.

२) उपासना फलद्रूप होण्यासाठी कर्मानुष्ठान आवश्यक असते. म्हणजे उपासना ही कर्मसमुच्चित असते. कर्मानुष्ठान न केले तर उपासना फळत नाही.

* अवतारोपासनेत आपल्या प्रिय भगवंताची आज्ञा म्हणून धर्माचरण आणि कर्मानुष्ठान होत असते. कर्मानुष्ठान न झाले तरी भक्तीत वैगुण्य येत नाही. पण भगवंतावरील प्रेमामुळे त्याची आज्ञा भक्ताला मोडवत नाही म्हणून धर्मानुसार आचरण होत





असते. त्यात कर्माची अपरिहार्यता नसते.

३) निर्गुणब्रह्माची प्राप्ती होण्यासाठी अक्षिपुरुषोपासना किंवा प्राणोपासना वगैरे करावी लागते. ह्या उपासना साधनभूत आहेत. निर्गुणब्रह्माची प्राप्ती झाली की या उपासना सुटून जातात. या देवतांच्या उपासना कार्यब्रह्माच्या आहेत. मुख्यब्रह्म किंवा कारणब्रह्म प्राप्त झाले की आपोआप या साधनरूप उपासना सुटून जातात.

*गौणीभक्तीत मात्र पूर्णब्रह्म अवतारांची म्हणजे मुख्य कारण-ब्रह्माचीच उपासना होत असते. अवतारांच्या कृपेने अद्वैतब्रह्मज्ञान होते. आणि पुढे ती उपासना भक्तिरूप होऊन जाते व कायम राहते. ज्ञानाच्या पूर्वी उपासक व उपास्य यांचे द्वैत राहते. पण ज्ञानानंतर तेच आहार्यद्वैत होऊन ज्ञानोत्तर भक्तिरूपाने भक्त





भगवंतावर प्रेमसमर्पण करीत राहतो.[5]

**‘ स्वयं फलरूपेति ब्रह्मकुमार’’ ॥** नारदसूत्र

४) अब्रह्मवस्तूच्या ठिकाणी (देवता किंवा प्रतीकांचे ठिकाणी) ब्रह्मभावना म्हणजे उत्कर्षबुद्धी करावी लागत असल्यामुळे उपासना कर्तृतंत्र असते किंवा अवस्तुभावन असते.

श्रुतिपुराणादिकांवरून अवतार पूर्णब्रह्म आहेत याचे परोक्षज्ञान असल्यामुळे उत्कर्षबुद्धी करण्याची गरज नसते. फक्त आपल्या सर्व वृत्ती ‘तदाकार’ करण्याचाच प्रयत्न करावा लागतो. वस्तुनुसार भावना करावी लागते म्हणून अवतारांची गौणीभक्ती वस्तुतंत्र म्हटली जाते.

५) उपास्य असलेल्या प्रतीकांचे ठिकाणी उत्कर्षबुद्धी केलीच पाहिजे. न केली तर जीवोपासना होईल आणि शास्त्रानुसार

जीवोपासनेचा निषेध असल्यामुळे पतन होईल आचार्यांनी **‘ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात्’** या सूत्रावरील भाष्यात जीवोपासनेचा निषेध केला आहे.

* अवतारांच्या ठिकाणी पती, पुत्र, मित्र, पिता, स्वामी किंवा शत्रू वगैरे कोणत्याही भावनेनप्रेम केले तरी, एकाग्र झाले तरी, पूर्णब्रह्माच्या ठिकाणी मन तदाकार झाल्यामुळे, मुक्तीच मिळते. रावण कंसादिकांनी शत्रुभावना केली तरी भगवंताने त्यांना मुक्तीच दिली. अजामिळाने पुत्रभावनेने मरता मरता ‘नारायण’ म्हणून हाक मारली तरी त्याचा उद्धारच झाला. या इतिहासावरून आणि शास्त्रावरून अवतारांचे ठिकाणी ब्रह्मबुद्धी केलीच पाहिजे असा दंडक नाही. तेथे **‘तदाकारकरण’** मात्र हवे असते.





६) उपास्य असलेल्या अब्रह्म वस्तूच्या ठिकाणी आत्मैक्य करता येत नाही. शंकराचार्य म्हणतात-

**‘‘अतश्चोपासकस्य प्रतीकैः समत्वादात्मग्रहो नोपपद्यते’’(ब्र.सू.शां.भा.४.१.४)**

* अवतारांच्या उपासनेत किंवा भक्तीत मीच परमात्मा आहे असे आत्मैक्य अनुभवावे लागते. **‘‘शिवो भूत्वा शिवं यजेत्’’** त्यानंतरच अवतारोपासना भक्तीत परिणत होते.

७) सकाम उपासकांना इंद्रलोकादि फले मिळतात. निष्काम उपासक असेल तर ब्रह्मदेवाबरोबर उपासक मुक्त होतो. म्हणजेच उपासकाला क्रममुक्ती मिळते. (श्रौतक्रीडापट)

* अवतारांच्या उपासनेने निर्गुण-बह्मानुभव येऊन ज्ञानोत्तर भक्ती मिळाली की जीवन्मुक्तीतच विदेहमुक्तीचा सोहळा भक्ताला





प्राप्त होतो. अंतर्बाह्य सर्वत्र परमप्रेमास्पद सगुण भगवंताची प्रतीती आल्यामुळे चिद्विलासाशिवाय इतर काही भासतच नाही. याप्रमाणे उपासना आणि भक्तीतील फरक थोडक्यात अवलोकन केला.

### संदर्भ-टीपा

*१)य.२.उ.पा.५५,ओवी १९. २)स्वमतनिर्णय य.१६. ३)कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम् ।। नारदसूत्र. ४)पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।गीता ५)स्वयं फलरूपेति ब्रह्मकुमारः ।। नारदसूत्र.*

*०००*





## सच्चिदानंदातील आनंदांश = भक्ती

सच्चिदानंद पदांचे थोडक्यात विवेचन करून **‘‘आनंदांशाचे स्फुरण म्हणजेच भक्ती’’**, असा महाराजांनी मांडलेला सिद्धांत प्रथम पाहू.सच्चिदानंदरूप परब्रह्म हे जड नसून चेतन आहे. चेतनाचा अर्थ स्फुरणरूपता होय. स्वतःहून स्फुरण पावणे हा त्याचा स्वभाव आहे. वृत्तीचे स्फुरण होणे आणि पुनः स्वतःचेच ठिकाणी लीन होणे ही परब्रह्माची निष्प्रयोजन लीला आहे.

वृत्ती स्फुरल्या की नामरूपात्मक सृष्टी भासू लागते. ही सृष्टी ब्रह्माहून वेगळी नसून ब्रह्मदृष्टीने चिद्विलासच असते.

**एकोऽहं बहु स्याम् ॥**
**एकाकी न रमते ॥**
**त्वं जातो भवसि विश्वतोमुखः॥**
**स एकधा भवति त्रिधा भवति ॥**
**अजयमानो बहुधा विजायते ॥**
**एकं सत् , विप्रा बहुधा वदन्ति ॥**

याप्रमाणे अनेक वैदिक श्रुतींनी 'एकच ब्रह्म बहुरूपाने स्फुरण पावते', असे अनेक ठिकाणी प्रतिपादन केले आहे. हे बहुभवन परब्रह्माची निष्प्रयोजन लीला म्हणजेच स्वभाव आहे.

**'लोकवत्तु लीला कैवल्यम्'** या व्यासांच्या ब्रह्मसूत्रावरील भाष्यात श्री आद्य शंकराचार्य हेच प्रतिपादन करतात.

**'किं करिष्यामि वृत्तिवान्'** इति असे अवधूत गीतेत दत्तात्रेय 'सर्व वृत्ती माझ्या ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीच आहेत' असे स्पष्ट





सांगतात.

मराठीतील आद्यसंतकवी श्रीमुकुंदराज परमामृतात म्हणतात की -

**आकाशे वायू केवि सांडावा ।**
**सागरें तरंग केवि दवडावा ।**
**तेवि तूं आपुल्या वृत्तिभावा । सांडिसी कैसा ॥**

या सर्व प्रमाणांचे ठिकठिकाणी संदर्भ देऊन महाराजांनी या चितीच्या स्वाभाविक क्रीडेचे निरूपण केले आहे.[१]

**वृत्ती तंव चितिविण नव्हे ॥८९॥ प्रसरण आणि संकोचन । चिदेकघनीं क्रीडनमात्र ॥९०॥**
**म्हणोनि भेद नसोनियाचि ते । जे सुखचि दुणावते।**
**वृत्तिप्रवाहें धांवते । भक्तिधारया ॥८४॥**[५]
**आकाशीं पवन, सागरी तरंग ।**
**तैशा ब्रह्मरंग वृत्ति साऱ्या**[६] **॥**
**तुज वाटे वृत्ति सकळही जाव्या ।**





**जडाचियेठेव्या कां घेतेस?॥**
**चेतन ही वस्तू, विश्वमय स्फूर्ति ।**
**तेचि नानावृत्तिरूप होय ॥**
**ब्रह्मीचे तरंग तैसे जाण जग ।**
**जाणुनिया रंग आत्मरंगी ॥** *ताईंना पत्र*

महाराजांच्या ग्रंथांत नाना ठिकाणी या चिद्विलासाचे वर्णन प्रासादिक शब्दात मांडलेले पहावयास मिळते. नामरूपांनी बहु प्रकारांनी स्फुरण पावणे (एकोहं बहुस्याम्) हे परब्रह्माचे स्वाभाविक लीलाविलास आहेत. या निर्गुण प्रत्ययासोबत चितीच्या विलासाचा प्रत्यय घेणे हाच पूर्णब्रह्मानुभव होय.

याप्रमाणे शुद्ध निर्विकल्प परब्रह्मच स्वतःचा आनंद पुनः पुनः घेण्यासाठी, स्वानंद द्विगुणित करण्यासाठी नानाविध वृत्तींनी स्फुरण पावते. **''द्वैत तंव तंव दूण । अभेदासी''- अमृ.**





- परंतु जीव अज्ञानी असल्यामुळे तो या वृत्तिस्फुरणाला 'मी' म्हणून ब्रह्माहून 'वेगळे' समजतो. म्हणजे वृत्त्यारूढ होतो; असे झाले की आपोआप ब्रह्माच्या विरोधी धर्म त्याला प्रतीत होऊ लागतात.

१.सर्व सृष्टी 'नाशिवंत' आहे असे दिसते.
२.स्वरूपाचा विसर पडल्यामुळे 'मी अज्ञानी आहे' व 'मी म्हणजे देह आहे' अशी समज होते.
३.'सुख पाहतां जवांपाडे व दुःख पर्वतायेवढे' सर्व सृष्टीवर नाशिवंत व दुःखरूपत्वाचा आरोप करून तसा भ्रमजन्य अनुभवही जीव घेतो.

या तीन गुणांच्या अपेक्षेनेच वेदान्तात ब्रह्माचे लक्षण, सत् म्हणजे त्रिकालाबाधित नित्य, चित् म्हणजेज्ञानस्वरूप आणि आनंदरूप असे त्रिविध मानलेले आहे.

(४१)

**असदाचिया व्यावृत्ती । सत् म्हणो आलेश्रुती ।
जडाचिये समाप्ती । चिद्रूप ऐसे ॥१०॥
दुःखाचेनि सर्वनाशे । उरले ते सुख ऐसे ।
निगदिले असे निश्वासे। प्रभूचेनि ॥११॥**

*अमृ.अ.५*

खरोखर सच्चिदानंद हे त्रिविध प्रकारचे नसून एकविध परब्रह्मच आहे.वृत्तींच्या वेगवेगळ्या स्फुरणामुळे ते त्रिविध भासते एवढेच.

जसे, कापूर एकच असतो पण तो शुभ्र, सुवासिक आणि मृदू असा त्रिविध गुणयुक्त भासतो. नेत्रेन्द्रियवृत्तीमुळे शुभ्र दिसतो. नासिकेने सुवासिक प्रतीत होतो व स्पर्शाने मृदू वाटतो. पण तिन्ही मिळून एकच कापूर असतो, त्याचप्रमाणे परब्रह्म एकच असूनही सद्रूप, चिद्रूप व आनंदरूप आहे, असा वृत्तिभेदांमुळे त्रिविध अनुभव येतो.[७] हाच विषय –



(४२)

**''सत तेचि चित । चित तोचि आनंद।
वस्तु नोहेत्रिविध । एकपद निजानंद॥''**

या अमृतानुभवातील विवेचनाप्रमाणे महाराजांनी देखील अनेक ठिकाणी विस्तारपूर्वक मांडले आहे. भगवद्भक्तिसौरभात –

**आनंद, चैतन्य आणि सत्ता । वृत्यवछिन्न चित् ज्ञानवत्ता । प्रीत्यवछिन्न आनंदता । परी एकीं एकता मोडेना ॥१९॥ तैसे सच्चिदानंद एक । परी कृत्युपाधीने भिन्न देख ॥२३॥अ.५**

**सुखा आणि सच्चित्सुखा । भेदू न घडे ॥२६॥** गीतासंगति.

सच्चिदानंदाचा प्रत्यय वृत्तींच्या भिन्नत्वामुळे भिन्न भिन्न येतो यावरच भक्तिशास्त्राची सारी इमारत उभी आहे. सर्व सत्पुरुषांच्या अनुभवाप्रमाणे हे तीन प्रत्यय भिन्न भिन्न अनुभवाला येत असले तरी आनंदाचा प्रत्यय प्रधान झाला की सत् व चित् त्यात मिळून जातात आणि



(४३)

पूर्णब्रह्माची एकविध स्थिती प्राप्त होते. अशा सच्चिदानंदघन ब्रह्माची प्राप्ती होण्यासाठी वेदान्तात प्रथम **व्यतिरेकानुभव** घेण्यास सांगितले आहे. सर्व नामरूपात्मक जगताला आपल्या देहासह अलग करावे तेव्हा हृदयात असलेला अंतरात्मा म्हणजे मीच 'त्रिकालाबाधित सत्य असून चिदानंदरूप आहे' असा **'अहं ब्रह्मास्मि'**चा समाधीत अनुभव येतो. यालाच **व्यतिरेकानुभव** म्हणतात. हीच निर्गुण समाधिस्थती होय.

या व्यतिरेकानुभवानंतर, ज्या नामरूपांची खोटी म्हणून उपेक्षा केली त्यातही एक शुद्ध परब्रह्मच ओतप्रोत भरलेआहे असा **अन्वयानुभव** साधावयाचा असतो. **'सर्वं खलु इदं ब्रह्म'** असा अन्वयाचा अनुभव हाच चिद्विलास होय. समाधीतून वृत्ती व्युत्थान पावल्या असता बाहेर भासणारा सर्व नामरूपात्मक सृष्टीचा



(४४)

पसारा ब्रह्मस्फुरणच होऊन जातो.

हा अन्वय पूर्ण साधल्यानंतर, वृत्तींचे स्फुरण झाले की चिद्विलास आणि वृत्ती लीन पावल्या की निर्गुण आत्मानुभव **'समाधीं व्युत्थानी हरि विलसे'** असा देवनाथांनी वर्णिलेलाअखंड समाधीचा प्रत्यय येऊ लागतो. समाधी असो की द्वैतइव वृत्तींचे स्फुरण असो, दोहो ठायीं-अन्तर्बाह्य एका अद्वैत ब्रह्माचाच पूर्णानुभव कायम असतो.

**इतर-व्यतिरेकीं जी आत्मप्रीति ।
अन्वयेंतीचि भगवद्भक्ति ॥ प्रीतिनिर्तन १.८७**

नामरूपांचा ब्रह्म म्हणून अनुभव घेणे म्हणजे अनध्यस्तविवर्त सचिदानंदघन सगुणसाकार लीलाविग्रही भगवंतावर सर्व प्रेमवृत्ती समर्पण करणे होय. परब्रह्माचा बहुभवनरूपी चिद्विलास सगुण भगवंताच्या

परमप्रेमानेच अनुभवला जातो.

या भगवद्‌भक्तीच्या आनंदातच सत्-चित् पदांची आटणी होते. या प्रीतिवृत्तीतच चिद्‌वृत्ती मिळून जाते आणि व्युत्थानातही निर्विकल्प पूर्णब्रह्मास्थिती प्राप्त होते.

## सदंश

**असदाचिया व्यावृत्ति ।**
**सत् म्हणो आले श्रुति ॥ अमृ.**

सर्व सृष्टीचा पसारा क्षणोक्षणी नाश पावणारा दिसतो म्हणून त्याच्या अपेक्षेने 'परब्रह्म कधीही नाश न पावणारे, त्रिकालाबाधित सत्य आहे' असे वेदान्तात प्रतिपादन केले आहे. 'सत् म्हणजे अस्तित्व किंवा सत्ता' प्रत्येक पदार्थमात्राला अस्तित्व असते. ते अस्तित्व परब्रह्माचेच अस्तित्व होय. (पण आपण आपल्या अस्तित्वाला ब्रह्मसत्तेहून भिन्न समजतो ते





अज्ञानामुळे.) प्रत्येक पदार्थात- 'सामान्य' असणारे अस्तित्व निर्गुणच असते. परब्रह्माची ही निर्गुण सत्ता आपल्याला सर्वच ठिकाणी प्रतीत होते. पदार्थाचे विशेषभाव बदलत असतात पण ही सामान्य निर्गुण सत्ता मात्र कायमच असते. 'पदार्थाला स्वतंत्र सत्ता नाही' म्हणजे पदार्थाला अस्तित्व नाही- म्हणजे पदार्थ खोटा आहे- म्हणजे तो भ्रम आहे; असा त्या वाक्याचा अर्थ होतो.

जसे, दोरी ब्रह्माच्या परमार्थसत्तेवर भासते व तीवर भासणारा सर्प दोरीच्या सत्तेवर भासतो. यात सर्पाची **प्रातिभासिक सत्ता** असते, दोरीची **व्यावहारिक सत्ता** असते व ब्रह्माची **परमार्थसत्ता** असते. दोरीचे ज्ञान झाले की सर्पाची निवृत्ती होते व ब्रह्मज्ञानाने दोरीचीही निवृत्ती होते, आणि शेवटी पारमार्थिक सत्ताच





कायम राहते. हाच परब्रह्माचा सदंश होय. या सदंशावरच सर्व सृष्टी भासत असते. पण आपण सृष्टीला ब्रह्माहून भिन्न अस्तित्व आहे असे समजतो. म्हणून सदंशाचा अनुभव येण्यासाठी सर्व सृष्टीचा, देहासह मन-बुद्ध्यादिकांचा देखील, व्यतिरेक करून हृदयात आत्मानुभव घ्यावा लागतो. या अनुभवालाच **व्यतिरेक-समाधी** म्हणतात. या समाधीत सत्, चित् व आनंदाचा एकत्र अनुभव येतो.

समाधीतून वृत्तीचे स्फुरण म्हणजे व्युत्थान झाले असता सदंशावर 'अहं ब्रह्मास्मि' ही **ज्ञानवृत्ती** स्फुरण पावते; किंवा भक्तीची **प्रीतिवृत्ती** स्फुरण पावते व ती सगुणाकार भगवंतावर अर्पण होते. यातील प्रेमवृत्ती आनंदाचे स्फुरण आहे व ज्ञानवृत्ती चित्‌चे स्फुरण आहे. या चिदानंदांच्या दोन्ही स्फुरणांना सदंशच





अधिष्ठान असतो. या चिद्‌वृत्ती व आनंदवृत्ती लय पावल्या असता निर्गुण असे **'सत्पद'** अनुभवले जाते.

आत्मज्ञानपूर्वक वृत्तींचा लय असेल तर त्या स्थितीला **'समाधी'** म्हणतात. आणि अज्ञानपूर्वक वृत्तींचा लय असेल तर मात्र तिला **'निद्रा'** म्हणतात. ज्ञान असो किंवा अज्ञान असो, वृत्तींचा लय सत्पदवाच्य निर्गुण ब्रह्मातच होत असतो. सदंशावरच वृत्ती स्फुरण पावतात आणि तेथेच लय पावत असतात. असा ''सर्व वृत्तींना आधार असलेला सदंश'' होय.

**बाधाभाव विशिष्ट सत्ता ।**
**वृत्त्यवछिन्न ज्ञानवत्ता । प्रीत्त्यवछिन्न आनंदता ।**
**परी एकीं एकता मोडेना ॥१९॥ भ.सौरभ**
**सत्पद तेब्रह्म चित्पद ते माया ।**
**आनंदपदी जया । म्हणती हरी ॥**

**सत्पद निर्गुण । चित्पद सगुण ।**
**सगुण निर्गुण । हरिपायी ॥**
**अस्ति भाति प्रिय । ऐसी पदे तिन्ही ।**
**एका जनार्दनी । तेचि झाले ॥**
**सत्पदे जड जग भासे । चित्पदे जीव विलसे।**
**आनंदपदे प्रत्यय असे । श्रीहरीचा ॥२३॥**

*भक्तिपदतीर्थामृत अ. ५.* *(*चिदंश=जाणीव=ज्ञान)*

निर्गुणब्रह्मावर वृत्तींचे स्फुरण होणे म्हणजेच शक्तीचा **'द्वैतइव'** आविर्भाव होणे होय. हे स्फुरण आनंदरूप आणि ज्ञानरूप असे दोन प्रकारचे आहे.

### *निर्गुणाची जाणीव*

ज्ञानाचे म्हणजे चिदंशाचे स्फुरण झाले असता त्या चित्स्फुरणालाच जीव 'मी मी' असे म्हणतो. या चिद्वृत्तीवर तो आरूढ होतो व स्वतःला ब्रह्माहून भिन्न समजतो. ज्ञानेश्वरीत–





**अर्जुनपण न घेता । 'मी'पण उठे जेपंडुसुता'**

अर्जुनपणाने म्हणजे ब्रह्मभिन्न 'अहं' रूपाने जर वृत्तिस्फुरण झाले तर ते विपरीत ज्ञान. 'मी काही जाणत नाही' हे **आवरण** व 'मी देह आहे' हा **विक्षेप** म्हणजे विपरीत ज्ञान. हे अज्ञानाचेच प्रकार असून ते ब्रह्मज्ञानाने नष्ट होतात.

प्रथम व्यतिरेकाने समाधी प्राप्त करून घेतली की त्यानंतरच्या व्युत्थानात 'अहं ब्रह्मास्मि' असा चिदंश स्फुरण पावतो. या स्फुरणात समाधीत अनुभवलेल्या निर्गुण ब्रह्माची जाणीव झाल्यामुळे म्हणजे चिदंश प्रधान झाल्यामुळे समाधीतील आनंद कमी झालेला असतो. त्या निर्गुणानंदात पुनः एकरूप होण्यासाठी ज्ञानी व योगी पुन्हापुन्हा अभ्यास करून निर्गुणसमाधी साधीत असतात. पण वृत्ती स्फुरण पावणे ही





ब्रह्माची स्वाभाविक लीला असल्यामुळे पुनः पुनः वृत्ती स्फुरतच असतात. हे अहंब्रह्मास्मिरूपी स्फुरणच ''वाचाऋण- अविद्यालेश- लेशाविद्या'' वगैरे नावांनी प्रसिद्ध आहे. अशी ही निर्गुण सत्पदाची जाणीवरूपी वृत्ती स्फुरणे म्हणजे चिदंशाचा पहिला प्रकार होय.

### *आनंदाची जाणीव*

वृत्ती जेव्हा आनंद घेऊन उठते तेव्हा तिला प्रीतिवृत्ती म्हणतात. ही प्रीतिवृत्ती जेव्हा सगुण भगवंताच्या चरणाकडे धाव घेऊन अर्पण होत असते तेव्हा व्यतिरेकरूप निर्गुण समाधी नसूनही व्युत्थानदशेत भक्तांना ब्रह्मानंद मिळत असतो. ही प्रीतिवृत्ती स्फुरण पावूनही ती जाणली जात नाही. - परंतु कधीकधी या सगुण ब्रह्मानंदाचा भोग घडतो म्हणजे भोक्तृत्व स्फुरण पावते. म्हणजेच आनंदाची जाणीव होते. ही





जाणीव होतांक्षणी भक्ताचा आनंद कमी होतो.

**उदा.** रासक्रीडेत गोपींना भगवंताचा संयोग झाला. 'अप्राप्य अशा भगवंताला आपण मिळविले' अशी त्यांना धन्यता वाटली म्हणजे भगवत्संयोगाची जाणीव झाली. अशी 'धन्योऽस्मि' वृत्ती (ज्ञातता) उठताच भगवान् अन्तर्धान पावले. या धन्यतेला किंवा आनंदाच्या जाणीवेला **'रसास्वाद'** विघ्न म्हणतात. रसास्वाद हा चिदंशातच गणला जातो.

समाधीतील सत्तारूप निर्गुणब्रह्माची म्हणजे सदंशाची जाणीव होणे हे **'वाचाऋण'** म्हटले जाते. आणि व्युत्थानातील भगवदर्पण होत असलेल्या प्रीतिवृत्तीची म्हणजे आनंदांशाची जाणीव होणे हे याला **'रसास्वाद'** म्हणतात. वरील ''वृत्तिलयरूप निर्गुण सदंशाची जाणीव'' आणि ''वृत्तिस्थ आनंदाची जाणीव'' या दोन्ही

चिदंशातच गणल्या जातात. या दोन्ही प्रकारच्या चिदंशांना गौण करून आनंदांशाला प्रधान करण्यासाठी- संयोगेऽपि वियोगोपलालनरूप असलेली पराभक्ती प्राप्त करून घ्यावी लागते.

*सत्-चित्-आनंदातील*

***आनंदांश म्हणजे भक्ती***

श्रीमहाराजांनी व्यक्त आणि अव्यक्त असे आनंदांशाचे दोन प्रकार केले आहेत.

**आनंदोऽपि द्विधा ज्ञेयो व्यक्त-अव्यक्तविभेदतः ।**
**अव्यक्तो ज्ञानयोगाभ्यां समाधौ-अनुभूयते ॥१८॥**
**योगो भक्तिप्रधानः ईश्वरप्रणिधानाद्वेति पातंजलात् ।**
**व्यक्तोऽपि ज्ञानभक्तिभ्याम्-अन्वयाच्चानुभूयते ॥१९॥**[१]

***अव्यक्त आनंद***

**१-** अद्वैत ज्ञानाने समाधी साधली असता, किंवा
**२-** योगाच्या साह्याने चित्तवृत्तींचा रोध करून समाधी साधली असता, किंवा





**३-** भक्तिपूर्वक समाधी साधली असता, अव्यक्त आनंद मिळतो. याप्रमाणे हा अव्यक्त आनंद समाधीतील सद्रूप निर्गुण ब्रह्मात वृत्ती लीन पावल्या असता प्राप्त होत असतो.

***व्यक्त-आनंद***

समाधीतून वृत्ती स्फुरण पावल्या असता व्युत्थानदशेत सगुण भगवंतावर प्रेम समर्पण केल्याने 'व्यक्तानंद' मिळतो, म्हणजे चित्ताच्या वृत्ती तैलधारावत् अविच्छिन्नपणे सगुण भगवंतावर अर्पण होत राहणे, हाच अखंड व्यक्त-ब्रह्मानंद होय. याने अन्वय पूर्णहोतो.

अव्यक्त-आनंद समाधीत वृत्ती लय पावल्या असता मिळतो. पण या दोन्ही ठिकाणी पूर्ण आत्मज्ञानसंपन्नता असणे आवश्यक आहे





***अव्यक्त निद्रानंद***

निद्रेमध्ये जीव ब्रह्माशी मिळत असतो पण अज्ञानपूर्वक. त्यामुळे तेथील ब्रह्मानंद मिळूनही त्याला सच्चिनंदाची प्रचिती येत नाही. श्रुतीमध्ये **'इंद्र व इंद्राणीचा सुषुप्तीत संगम होतो'** असे वर्णन आहे. त्याचाही हाच आशय आहे. बाहेरविषयांकडें धावणाऱ्या वृत्ती निद्रेत अंतरात्म्याच्या ठिकाणी म्हणजे निर्गुण ब्रह्मात लीन होतात. तेथे मिळणारा आनंद बाह्य विषयापासून मिळत नसून आपलीच वृत्ती आपल्याच ठिकाणी लय पावल्याने मिळतो. झोपेतून उठल्यावर **'मी काहीही जाणत नव्हतो'** अशी अज्ञानवृत्ती व **'मी सुखाने झोपलो होतो'** अशी सुखाची जाणीव तो बोलून दाखवितो. यावरून जीवाचे अज्ञान कायम राहून निद्रेत





ब्रह्मानंद असतो असे सिद्ध होते. हा अव्यक्त आनंदाचाच प्रकार होय.

***समाधीतील निर्गुणानंद***

**ज्ञानसमाधी** – सर्व जगताचा व्यतिरेक म्हणजे स्वतःपासून अलग करून 'मीच ब्रह्म आहे' असा ज्ञानाभ्यास करणारा साधक शेवटी जीवब्रह्मैक्यरूप निर्गुण समाधी प्राप्त करून घेतो. या व्यतिरेकसमाधीत सर्व चित्तवृत्ती निर्गुण स्वरूपाचेठिकाणी लीन असल्याने ब्रह्मानंदाची प्राप्ती होते. हाच ज्ञान्याच्या समाधीतील अव्यक्त निर्गुणानंद होय.

**योगसमाधी** – प्राणायामादी योगसाधनेने चित्ताचा निरोध करून योगी निर्गुणरूप व्यतिरेक-समाधी साधतात. या समाधीत जीवब्रह्मैक्य होते व सच्चिदानंदघन निर्गुण ब्रह्माचा अव्यक्तानंद स्वतःच्या ठिकाणीच घेतला जातो.

**भक्तीची समाधी** - उपासक जेव्हा सगुण-साकार अनध्यस्तविवर्त अवतारविग्रहांची उपासना करून आत्मनिवेदन करतो तेव्हा भगवान् त्याला बुद्धियोग देतात आणि उपासकाच्या वृत्ती अन्तरात्म्याच्या ठिकाणी लय पावून अद्वैतज्ञान मिळते व समाधी साधली जाते व निर्गुण ब्रह्मानंद मिळतो. यानंतर ज्ञानोत्तर भक्तीचा आरंभ होतो. अशा भक्तांच्या वृत्ती जेव्हा हृदयातील अन्तरात्म्यात लीन असतात तेव्हा देखील भक्तांना निर्गुण समाधीतील अव्यक्त ब्रह्मानंदच मिळत असतो.

अशाप्रकारे ज्ञानी, योगी व भक्त या तिघांचीही समाधिस्थिती एकसारखी असते. समाधीत त्यांच्या सर्व वृत्ती निर्गुण सच्चिदानंदरूप ब्रह्मात लय पावलेल्या असतात. यावेळी अव्यक्त ब्रह्मानंद असतो;





पण नंतर **वृत्तींचे व्युत्थान** झाले असता योगी व ज्ञानी यांना जड विनाशी दुःखरूप अशा मिथ्या जगताचा भास कायम राहतो, तर भक्तांना मात्र सच्चिदानंदघन सगुण श्रीहरीचाच प्रत्यय येतो. त्यामुळे योगी व ज्ञानी यांना आत निर्गुणब्रह्मप्रत्ययाचा अव्यक्तानंद मिळतो पण बाहेर मात्र अब्रह्मप्रत्यय (जगन्मिथ्या) येतो; उलट भक्तांना मात्र आत अव्यक्तानंद व बाहेर सगुण आनंद असा अन्तर्बाह्य पूर्ण अखंड ब्रह्मानंदाचा प्रत्ययच कायम असतो.

***व्यक्त विषयानंद***

खरोखर वृत्ती एकाग्र झाली असता आपलाच आनंद आपल्याला मिळत असतो. परंतु आपण अज्ञ जीव, आनंदाचे स्थान बाह्य विषय आहेत असे समजून विषयावर मन एकाग्र करतो व विषयापासून आनंद मिळाला असे





समजतो.

जसे, एखादा कुत्रा कोरडे हाड चघळताना त्याच्याच हिरड्यातून रक्त येत असते, पण त्याला वाटते की हाडातून रक्त येत आहे. तसेच आपल्या वृत्ती बाह्य विषयाचे ठिकाणी एकाग्र झाल्या की आपलाच आत्मानंद आपल्याला मिळतो. हाच वृत्तींच्या साह्याने बाहेर प्रगट होणारा, बाहेर समजला जाणारा व्यक्त विषयानंद होय.

***व्यक्त भक्त्यानंद***

भक्तीने प्राप्त होणाऱ्या आनंदात सदंश व चिदंश हे गौण म्हणजे अव्यक्त होऊन राहतात. व्युत्थानातील भक्त व भगवान् या द्वैताला **आहार्यद्वैत** म्हणजे **द्वैतइव स्थिती** म्हणतात. असे आहार्यद्वैत भासले तरी भक्ताची अद्वैतस्थिती मोडत नाही. व्युत्थानातील





वियोगोपलालनरूपी परमप्रेमात तर भक्ताला निर्वृत्तिक निर्विकल्प सहजभक्ती प्राप्त होते. हीच पूर्णब्रह्मस्थिती आहे.

या व्युत्थानातील भक्तीत सगुण भगवान् **'आनंदेदंता'**रूप असून त्यापासून मिळणारा आनंद **व्यक्त भक्त्यानंद** असतो.

***भक्ती : गौणी, मध्यमा व परा***

भक्ताच्या अंतःकरणातील वृत्ती जेव्हा सगुण भगवंताला आलंबन घेऊन उठतात तेव्हा भक्ती म्हणतात. या सर्व वृत्ती युगपत् म्हणजे एकदम न उठतां वेगवेगळ्या उठत असतात. वृत्तींच्या नानात्वामुळे परमप्रेमाच्या समर्पणाला भिन्न भिन्न नांवेदिली गेली आहेत. तेच भक्तीचे सोळा प्रकार होत.

**श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन,वंदन, दास्य व सख्य** – हे आठ प्रकार

ज्ञानपूर्व उपासनेचे म्हणजे गौणभक्तीचे आहेत.

आत्मनिवेदनातील **अहंतासमर्पण व ममतासमर्पण** आणि **लालन व वात्सल्य** असे चार प्रकार जीवब्रह्मैक्यरूपी समाधी साधल्यानंतरचे म्हणजे ज्ञानोत्तरभक्तीचे आहेत. हिला मध्यमा भक्ती म्हणतात.

**'सएवाहं'** या सामानाधिकरणाला माधुर्याची जोड दिली की

**गुप्तसंयोग, स्पष्ट संयोग,**

**गुप्तवियोग व स्पष्ट वियोग**

असे चार प्रकार माधुर्यरूपी पराभक्तीचे होतात.

एकूण अशा सोळा प्रकारात जरी गौण-श्रेष्ठता असली तरी पराभक्ती मिळाल्यानंतर मात्र हे सर्व वृत्तिभेद परमप्रेमरूपा पराभक्तीचेच उन्मेष होऊन जातात. गौण आणि परा या





भेदाला थारा नसतो. ती सारी एकाकार पराभक्तीच असते.[१०]

### *भक्तीतील दहा रस*

या पराभक्तीत एकूण दहा रस अनुभवले जातात. त्याचेही सुरेख वर्णन भक्तिपदतीर्थामृतात आले आहे.[११] **शृंगार, वीर, करुण, शांत, हास्य, भयानक, अद्‌भुत्, बीभत्स, रौद्र, आणि माधुर्य** यांच्या व्याख्या महाराजांनी अर्ध्या अर्ध्या ओवीत सांगितल्या असून अत्यंत मार्मिक, नवीन आणि चिंतनीय आहेत. त्यांचा स्वतंत्रपणे विस्तारपूर्वक अभ्यास करणेच योग्य राहील.

असे भक्तीचे सोळा प्रकार व भक्तीतील दशविध रस हे सर्व भक्ताच्या प्रेमळ अन्तःकरणात उद्‌भूत होऊन भगवच्चरणावर अर्पण होत असतात. या स्थितीत भक्तांच्या ठिकाणी भक्ती असूनही भगवंताच्या





षड्‌गुणैश्वर्यासंबंधीचे माहात्म्यज्ञान[१२] आणि अद्वैतज्ञान त्यांच्या ठिकाणी कायम असते.

### *संयोगात वियोगाची उत्कटता*

समाधीमध्ये पूर्ण जीव-ब्रह्मैक्य झाल्यानंतर ज्ञानी जेव्हा समाधीतून व्युत्थान पावतो तेव्हा चिदंश प्रधान होतो. सच्चिदानंदाची जाणीव स्फुरण पावते. हेच **'अहंब्रह्मास्मिरूप वाचाऋण'** म्हटले जाते. या जाणीवेत समाधीतील आनंद कमी झालेला असतो. हेच चिदंशाचे प्राधान्य होय.

भक्ती प्राप्त नसलेले आत्मज्ञानी किंवा योगी पुरुष व्युत्थानात पुनः पुनः अहं ब्रह्मास्मीचा अभ्यास करून पुनः पुनः समाधीतील निर्गुणानंद प्राप्त करून घेत असतात. परंतुभक्तांना मात्र पूर्वीपासून आपल्या सर्व वृत्ती आनंदपदी स्थित असलेल्या अनध्यस्तविवर्त सगुणसाकार





भगवंतावर अर्पण करण्याची संवय असते, त्यामुळे व्युत्थानात कोणतीही वृत्ती स्फुरण पावल्याबरोबर ती सगुणार्पण होत असते.

भक्ताची वृत्ती ही प्रीतिवृत्ती म्हणजे आनंदाची वृत्ती असते, ज्ञानवृत्ती किंवा जाणीव नसते.

(१) निर्गुण ब्रह्माची जाणीव म्हणजे **वाचाऋण,**

(२) सगुण भगवंताच्या संयोगातील आनंदाची जाणीव म्हणजे **रसास्वाद,**

हे दोन्ही चिदंशच आहेत. हे चिदंश प्रधान होतील की काय, याचे भक्ताला अतिशय भय वाटते. हेच वियोगभय होय. या भयामुळे भक्ताची भगवद्दर्शनापूर्वी असलेली दर्शनोत्कंठा तशीच कायम असते. गोविंदानंदसुधेत महाराज म्हणतात -

**अदृष्टे दर्शनोत्कंठा दृष्टे विश्लेषभीरुता ।**

**दृष्टेऽदृष्टे परं दुःखं तदप्यस्ति महत्सुखम् ॥४५॥**

अशा या उत्कट प्रेमाला संयोगातील वियोगोपलालनरूपी प्रीतिवृत्ती म्हणतात. या व्युत्थानदशेत भक्त आणि भगवान् अशी द्वैतइव स्थिती असते. हेच आहार्यद्वैत[१३] असून भक्ताचे भगवंताचे ठिकाणी असलेल्या परमप्रेमाला पराभक्ती म्हणतात. हाच आनंदांश होय. यात सत्पद व चित्पद गौण रूपाने म्हणजे अव्यक्त असतात. आनंदाश प्रधान असून तो प्रीतिवृत्तीला आलंबन असणाऱ्या श्रीहरिरूपाने व्यक्त असतो.

भक्त प्रीतिवृत्तिस्थ असला म्हणजे वृत्ती उठलेली असूनही ती जाणली जात नाही. तेव्हा हिलाच निर्वृत्तिक अवस्था म्हटली जाते. भक्ताची प्रेमवृत्ती सगुण भगवदाकार असताना जाणली जात नाही, ती केवल आनंदाकार असते.

समाधीत वृत्ती लय पावली असते-





अव्यक्त असते म्हणून जाणली जात नाही. आणि पराभक्तीत प्रेमवृत्ती उद्‌भूत असते; आनंदाकार असते तरीपण ती जाणली जात नाही.

याप्रमाणे भक्ताच्या समाधिव्युत्थानात दोन्ही दशेंत निर्वृत्तिक परब्रह्मच अनुभवले जाते. समाधीत जसा सच्चिदानंदाचा प्रत्यय येतो तसाच सच्चिदानंदाचा पूर्ण प्रत्यय व्युत्थानातील पराभक्तीतही भक्ताला असतो.

पण जेव्हा एखादे वेळी भक्तीची वृत्ती जाणली जाते तेव्हा मात्र चिदंश प्रधान होऊन आनंदांश गौण होतो. त्यावेळी भक्ताला आनंदांशाचा म्हणजे सगुणसाकार श्रीहरीचा[१४] वियोग सहन होत नाही. तो व्याकुळ होतो. वियोगामुळे त्यांच्या उत्कट प्रेमवृत्ती पुनः सगुण श्रीहरीकडे ओढ घेतात त्यामुळे भक्त पुनः प्रेमानंदात निमग्न होतो. म्हणजेच पुनः आनंदांश





प्रधान होऊन स्वाभविक निर्वृत्तिक ब्रह्मस्थिती अनुभविली जाते.

या आनंदाला ब्रह्माच्या सदंशाची सत्ता असते. पण आनंद प्रधान झाला की सदंशाकडे लक्ष नसते एवढेच. या आनंदांशात चिदंश म्हणजे 'अहंब्रह्मास्मि'रूपी जाणीव अव्यक्तरूपाने त्यात मिळून असते म्हणजे गौण होते, नष्ट होत नाही.

जसे, 'मी अमुक अमुक आहे' ही जाणीव आपल्याला नेहमी असते पण ती बहुतेक अव्यक्तरूपाने कायम असते. ती नसती तर 'मी असे बोललो होतो' असे स्मरण आपल्याला कधीच झाले नसते. एका वेळी एकच वृत्ती उद्‌भूत असते व इतर वृत्ती गौण रूपाने म्हणजे अव्यक्त रूपाने असतात म्हणूनच आनंदांश प्रधान झाला की त्यात चिदंश व सदंश गौण होतात,





अव्यक्त होतात पण नाहीसे मात्र होत नाहीत.

चिदंश दोन प्रकारचा आहे हे आपण वर पाहिले. निर्गुण ब्रह्माची जाणीव म्हणजे **'वाचाऋण'** आणि आनंदाची जाणीव म्हणजे **'रसास्वाद'.** या दोन्ही तऱ्हेच्या जाणीवा **'संयोगे ऽपि वियोगोपलालन'**रूपी माधुर्यप्रेमात उठत नाहीत. ही पराभक्ती प्राप्त असलेल्या भक्ताला भगवत्संयोग नित्य असतो पण तेव्हा देखील वियोगातील प्रेमाची उत्कटता कायम असते.

श्रीतुकाराममहाराज या 'संयोगे ऽपि वियोगोपलालन' रूपी प्रेमाचा अनुभव अगदी सोप्या शब्दात वर्णन करतात-

**आता दृष्टीपुढे ऐसाचि तूं राही ।**
**जो मी तुज पाही पांडुरंगा ॥**

'जो मी तुज पाही' या चरणात भगवत्संयोग आहे. आणि पहिल्या चरणातील

'ऐसाचि तूं राही' या वचनात वियोगातील उत्कटता कायम आहे.

भगवान दृष्टीपुढे असताना भगवंताचा पुनः वियोग तर होणार नाही? किंवा अहं ब्रह्मास्मि हे वाचाऋण तर उठणार नाही? किंवा धन्यतेचा अभिमान म्हणजे रसास्वाद तर पुन्हा येणार नाही? अशा विरहाच्या विविध शंकांमुळे खऱ्या विरहात असलेली ओढ संयोगातही कायम राहते. या प्रेमात तृप्ती नसते. ही धारावाही गंगौघासारखी प्रेमवृत्ती सारखी भगवंताकडे लागून राहणे म्हणजेच आनंदांश प्रधान होणे होय.

अशा सगुणाच्या प्रेमानंदात म्हणजे व्यक्तानंदात म्हणजे 'इदं प्रत्ययावच्छिन्न समाधीत' सत्पद व चित्पद गौण होऊन निर्वृत्तिक पूर्णब्रह्मस्थिती भक्ताच्या अंगी बाणली जाते.





याप्रमाणे वृत्तींच्या व्युत्थानातही परमप्रेमाची- तृप्तिरहित आनंदरूप स्थिती प्राप्ती झाली म्हणजे भक्तांना दोनच अवस्था असतात-

(१) वृत्तिलयरूप निर्गुण समाधी व

(२) 'तत्सुखसुखित्वं' या भक्तिसूत्रात अनुस्यूत असलेली इदं प्रत्ययरूपा- सर्ववृत्ति-समर्पणरूपा पराभक्ती.

***संधिसमाधी***

भक्ताच्या दोन प्रीतिवृत्तींच्या मधली अवस्था म्हणजे वृत्तींची लीनावस्था हीच निर्गुण समाधी होय. हिलाच संधिसमाधि म्हणतात. या संधिसमाधीत भक्तांना 'निर्गुण ब्रह्मानंद' मिळतो.

***आनंदेदंतारूप श्रीकृष्णस्वरूप***

भक्ताच्या वृत्तींचे व्युत्थान झाले असता मात्र सर्व वृत्ती आनंदेदंतारूप श्रीकृष्णस्वरूपावर 'तत्सुखसुखित्वं'च्या प्रेमाने केंद्रित होतात व





भक्ताला 'सगुण भक्तान्यानंद' मिळतो.[15]

केवळ ज्ञानी किंवा योगी यांना व्युत्थानात भासणारा, प्रारब्धाची सुखदुःखे देणारा, नामरूपात्मक द्वैतरूपी खोटा/मिथ्या प्रपंच भक्तांना भासतच नाही. उलट त्या जागी भगवंताचा प्रेमसाकार लीलाविग्रहच सर्वत्र दिसू लागतो. त्यालाच आलंबन घेऊन सर्व प्रेमवृत्ती उठत असतात. समाधीत आणि व्युत्थानात एक ब्रह्मानंदच अन्तर्बाह्य प्रतीत होतो. असा प्रीतिवृत्तींच्या संधीत ज्ञानस्वरूप निर्गुण ब्रह्मानंद आणि वृत्ती उठल्या असता व्युत्थानात सावळ्या गोपाळाचा सगुणानंद असा अन्वयाचा अनुभव घेऊन भक्त चिद्विलासात रममाण होतो, हीच परब्रह्माची स्वरूपस्थिती असून तिलाच सहजावस्था म्हणतात. अद्वैत परब्रह्माचे द्वैतरूपी बहुरूपाने स्फुरण खऱ्या द्वैताला कारण होत





नाही, उलट ब्रह्मानंदच या प्रेमस्फुरणामुळे दुणावला जातो.[16]

**'भेद तंव तंव दूण अभेदुरी'' - ज्ञाने.**

**'अद्वैतं परमर्थोहि द्वैतं तद्भेद उच्यते'**- शंकराचार्य

हीच परब्रह्माची निर्वृत्तिक स्वाभाविक स्थिती होय. वृत्ती असूनही जाणल्या न जाणे- हा व्युत्थानातील परमप्रेमाचा विशेष आहे. यामुळेच आनंदांशस्थित सहजाभक्तीला निर्वृत्तिक स्थिती म्हटले जाते.

वृत्तींचे स्फुरण झाल्यामुळे अत्यंत अद्वैतरूप असलेले एकविध परब्रह्मच वृत्तिभेदामुळे सत् चित् व आनंद या त्रिविध रूपाने भासते. स्वतःहून स्फुरण पावणे हा चेतन परब्रह्माच स्वभाव असल्यामुळे सत्पद या निर्गुणावर अद्वैत ज्ञानसंपन्न आनंदवृत्तीचे स्फुरण होणे व ते स्फुरण सगुण श्रीहरीवर अर्पण होणे

हीच **''द्वैतइव''** पराभक्ती होय. यावरच **''संयोगेऽपि वियोगोपलालनरूपी माधुर्यभक्ती''** ची कशी उभारणी झाली आहे? आणि सच्चित् यांचा एकत्र प्रत्यय आनंदांशात म्हणजेच भक्तीत कसा एकवटला आहे, यासंबंधी सर्व संतांनी अनेक ठिकाणी उल्लेख केलेले आहेत.[१७] त्यांचा आधार देऊन आणि आपल्या स्वानुभवाच्या बळावर महाराजांनी विस्तृत विवेचन आणि खंडनमंडनपूर्वक शास्त्रीय चर्चा करून[१८] हा गहन विषय आपल्या समर्थ लेखणीने प्रतिपादन केला आहे - **आनंद,चैतन्य आणि सत्ता । वृत्त्यवच्छिन्न चित् ज्ञानवत्ता । प्रीत्यवच्छिन्न आनंदता । परी एकीं एकता मोडेना ॥** या पराभक्तीची महाराजांनी १६ प्रकारात केलेली विभागणीही लक्षणीय आहे. ०००





## गौणी भक्ती

**(ज्ञानपूर्व उपासना)**

१. श्रवण
२. कीर्तन
३. स्मरण
४. पादसेवन
५. अर्चन
६. वंदन
७. दास्य

## मध्यमा भक्ती

**(ज्ञानोत्तर भक्ती)**

९. ममता-समर्पण
१०. अहंता-समर्पण
११. लालन
१२. वात्सल्य

## परा-भक्ती

**(माधुर्य-भक्ती)**

१३. गुप्त संयोग
१४. स्पष्ट संयोग
१५. गुप्त वियोग
१६. स्पष्ट वियोग





## भक्तीतील दहा रस

१. शृंगार
२. वीर
३. करुण
४. शांत
५. हास्य
६. भयानक
७. अद्भुत
८. बीभत्स
९. रौद्र
१०.माधुर्य





## श्रीगुलाबरावमहाराज : ग्रंथसूचि

**(यष्टि १)** रु. ४०
**(यष्टी २)** पूर्वार्ध रु.४०
( ,, ) उत्तरार्ध रु.५०
**(य.३)**प्रियलीलामहोत्सव रु.८०
**(य.४)** स्त्रीगीत संग्रह रु.४०
**(य.५)** अलौ.व्याख्याने रु.५०
**(य.६)**स्वमन्तव्यांश०हिं. रु.५०
**(य.७)** ३८ पत्रे रु.६०
**(य.८)** साधुबोध रु.६०
**(य.९)**अभंगांची गाथा रु.१००
( ,, ) पदांची गाथा रु.१००
**(य.१०)** प्रेमनिकुंज रु. ७५
**(य.११)** संप्रदायसुरतरु
पूर्वविहार रु.१२०
उत्तरविहार रु.१२०
**(य.१२)** पत्रे ४६ रु.६०
**(य.१३)** वेदान्त०दीपिकारु.५०
**(य.१४)**भक्ति.-सांख्य० रु.८०
**(य.१५)**आत्मचरित्रादि रु.१२०
**(य.१६)**संस्कृत ३१रचनारु.१२०
**(य.१७)**सुबोध हिंदुधर्म रु.८०
**(य.१८)**स्फुटनिरूपणे रु.५०
**(य.१९)**हिंदी गीता रु.५०
**(य.२०)**योगप्रभाव गद्य रु.१२०

**'श्रीमहाराजांचे चरित्र'**
त्रिपुरवारकृत (मूळ) रु.१५०
**'माधुर्यमधुकोश'** महाराजांच्या ग्रंथांतील विषयसूचि रु.३००
**१३० ग्रंथांचा सारांश**
(११४ पत्रांसह) रु.२०

श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहीसाथ, अमरावती




**श्रीसद्‌गुरु श्रीबाबाजीमहाराज पंडितांचे ग्रंथ**

| | | | |
|---|---|---|---|
| १.आर्यधर्मोपपत्ति | (रु.५०) | २.हरिपाठ-रहस्य | (रु.६०) |
| ३.अमृतानुभवकौमुदी | (रु१५०) | ४.ज्ञाने.गूढार्थदीपिका | (३००) |
| ५.अभंगगाथा | (रु.५०) | ६.विविध लेखसंग्रह | (१५०) |
| ७.संतकथा | (रु.१५) | ८.पंचदशी प्रवचने | (रु.) |
| ९.भागवत प्रवचने | (रु.) | | |

**श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैतसांप्रदायिक मंडळ,दहीसाथ,अमरावती**

अम. ०७२१-२६७६३०७ / नाग. ०७१२-२०२०५५६








**जारिणीचे परपुरुषी मन ।**
**की विरहिणीचा विरह गहन ।**
**तो विषय-भाव वेगळा करून ।**
**हरिरूपी प्रेम-योजन,**
**ते भक्ती ॥**

ओवी ४३.अ१.भक्तिपदतीर्थामृत









This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.